।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229246

## OFFICE OF THE REGISTRAR

Website: www.srtmun.ac.in

Fax : (02462) 229572

E-mail: srtmunregistrar@gmail.com


जावक क्रमांक आस्था/०२/२०२०–२१/६९

दिनांक ०५–०६–२०२०

**– परिपत्रक –**

संदर्भ : (१) प्रस्तुत विद्यापीठ परिपत्रक क्रमांक आस्था/०२/२०२०–२१/६४ दि. ०१–०६–२०२०

(२) Government of Maharashtra Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai Order No. DMU/2020/CR.92/DisM-1, dated 31st May, 2020] 4th June, 2020

(३) मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे पत्र क्रमांक २०२०/आरबी–१/डेस्क२/टे–४/crpc१४४/ प्र.क्र. – १३/दिनांक ०४ जून, २०२०

मा. जिल्हाधिकारी महोदयांनी उपरोक्त संदर्भानुसार नांदेड जिल्हयातील कार्यालये/शैक्षणिक संस्था (विद्यापीठे/महाविद्यालये/शाळा) याठिकाणचे कर्मचारी यांना प्रतिबंधीत क्षेत्र (Containment Zone) वगळून उर्वरित क्षेत्रासाठी कोव्हीड–१९ रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाच्या अधिन राहून, फक्त अध्यापनाव्यतिरिक्त इतर कामांकरिता कार्यालयात उपस्थित राहून उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन आणि परीक्षांचे निकाल यासारखे व इतर कार्यालयीन कामे करण्यासाठी मुभा दिली आहे.

त्या अनुषंगाने नांदेड जिल्हयातील प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठातील तसेच कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथील शैक्षणिक संकुलातील/प्रशासकीय विभागातील सर्व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी अध्यापनाव्यतिरिक्त उत्तपत्रिकांचे मुल्यांकन आणि परीक्षांचे निकाल यासारखे व इतर कार्यालयीन कामे करण्यासाठी आपापल्या महाविद्यालयांत/कार्यालयात उपस्थित रहावे व अनुषंगिक कामे करावीत.

मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सदरील आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल असे कळविले आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त आदेश व या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

वरील परिपत्रक फक्त नांदेड जिल्हयातील संलग्न महाविद्यालये, विद्यापीठ परिसर आणि कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट यांच्यासाठी लागू राहील.

05/06/2020

कुलसचिव

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रति,

(१) प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ,
(२) सर्व संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले/प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
(३) समन्वयक, कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.
(४) श्री. अजय दर्शनकार, सिस्टिम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ (प्रत संकेतस्थळावर ठेवण्यासाठी)

प्रत माहितीस्तव –

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

# जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

**जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३** **दिनांक.०४.०६.२०२०**

वाचा:- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश दि. १५.०४.२०२०, दिनांक १९.४.२०२० सुधारीत आदेश दिनांक २०.४.२०२०, दि.२१.०४.२०२०, दि.२३.०४.२०२० आदेश दिनांक ३.५.२०२०, दिनांक १७.०५.२०२०, दिनांक १९.०५.२०२०, दि.२१.०५.२०२०, विस्तारित आदेश दिनांक २२.०५.२०२० व दिनांक ३१.०५.२०२०.

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई आदेश क्रं. DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि.०२.०५.२०२०, ०३.०५.२०२०, ०५.०५.२०२०, १५.५.२०२०, १७.०५.२०२०, १९.०५.२०२० ,दि.३१.०५.२०२० व दिनांक ०४.०६.२०२०.

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना च्या अनूषंगाने नांदेड जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नूसार प्रतिबंधात्मक आदेशा बाबत.

**आदेश**

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ०१ वरील आदेश दिनांक ३१/०५/२०२० अन्वये जिल्हयात जमावबंदी आदेश, नियमावलीसह पुढील आदेशा पर्यंत नांदेड जिल्हयात नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात संदर्भ क्र.०१ वर नमूद या कार्यालयाचे इतर आदेशातील अटी व शर्ती जशास तसे पुढील आदेशा पर्यंत लागू राहतील असे आदेशीत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी संदर्भ क्रमांक ०३ वरील आदेश दिनांक ०४.०६.२०२० अन्वये त्यांचे आदेश दिनांक ३१.०५.२०२० मधील परि.७ मध्ये उपपरिच्छेद (I) समाविष्ठ करुन यामध्ये कार्यालय/शैक्षणिक संस्था (विद्यापीठे/ महाविद्यालये/शाळा )या ठिकाणचे कर्मचारी यांना फक्त अध्यापना व्यतिरिक्त इतर कामाकरिता कार्यालयात उपस्थित राहून उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन आणि परिक्षांचे निकाल यासारखे व इतर कार्यालयीन कामे करण्यासाठी मुभा दिली आहे.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन इटनकर,भा.प्र.से. जिल्हादंडाधिकारी नांदेड, संपूर्ण नांदेड जिल्हयात वरिल प्रमाणे कार्यालय/शैक्षणिक संस्था ( विद्यापीठे/महाविद्यालये/शाळा ) या ठिकाणचे कर्मचारी यांना प्रतिबंधीत क्षेत्र ( Containment Zone ) वगळून उर्वरित क्षेत्रासाठी कोव्हिड-१९ रोग्याच्या प्रादूर्भाव रोकण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाच्या अधिन राहून फक्त अध्यापना व्यतिरिक्त इतर कामाकरिता कार्यालयात उपस्थित राहून उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन आणि परिक्षांचे निकाल यासारखे व इतर कार्यालयीन कामे करण्यासाठी मुभा देण्यात येते.

सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

हे आदेश दि. ०४.०६.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद.

D PC CORONA

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.
पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

प्रतिलीपी - आवश्यकत्या कार्यवाहीस्तव

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधीक्षक, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
९. सर्व संबंधित विभाग प्रमुख यांना अनुपालनास्तव
१०. जिल्हा माहीती अधिकारी, नांदेड

जिल्हादंडाधिकारी नांदेड

D PC CORONA